**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

क्रमांक-रानिआ/मनपा-२०१४/प्र.क्र. २०/का.५,
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- - १७/११/२०१४

परिपत्रक

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे मतदान इलेक्ट्रॉनिक व्होटींग मशिनवर घेण्यात येत आहे. त्यामुळे इलेक्ट्रॉनिक व्होटींग मशिनवर लावण्यासाठी, टपाली मतपत्रिकेसाठी तसेच प्रदत्त मतदानासाठी (टेंडर व्होट) मतपत्रिका छापून घ्याव्या लागतात. छापून घ्यावयाच्या मतपत्रिकांची संख्या कमी असल्याने मतपत्रिका स्थानिक पातळीवर छापून घ्याव्यात किंवा कसे याबाबत आयोगाकडे वेळोवेळी विचारणा करण्यात येते. यासंदर्भात स्पष्ट करण्यात येते की, मतपत्रिकांची सुरक्षितता राखण्याच्या दृष्टीने तसेच निवडणूक चिन्हांची योग्यरित्या छपाई होणे आवश्यक असल्याने सर्वसाधारणपणे मतपत्रिका शासकीय मुद्रणालयाकडून छापून घेणे आवश्यक असते. तथापि, शासकीय मुद्रणालयाकडून मतपत्रिका छापून घेण्यात काही अडचण असल्यास किंवा छापावयाच्या मतपत्रिकांची अल्प संख्या लक्षात घेता शासकीय मुद्रणालयाकडून मतपत्रिका छापून घेणे व्यवहार्य ठरत नसल्यास आवश्यक मतपत्रिका स्थानिक पातळीवर छापून घेण्यास राज्य निवडणूक आयोगाची हरकत नाही. तथापि, अशारितीने मतपत्रिका छापून घेताना त्यांची सुरक्षितता राखली जाईल तसेच मतपत्रिकेवरील उमेदवारांची नावे व इतर तपशील योग्यरित्या छापला जाईल याची दक्षता घेण्यात यावी.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :- सर्व जिल्हाधिकारी (मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा वगळून)
सर्व महानगरपालिका आयुक्त
राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयातील सर्व अधिकारी/सर्व कार्यासने
निवड नस्ती